महासागर
रविवार, दि. 18 जानेवारी 2026
अमरावती
पान 3

| प्रभाग क्रमांक | प्रभागाचे नाव | नाव | पक्ष |
|---|---|---|---|
| 11 | रुख्मिनी नगर - फ्रेजरपुरा | विद्या शिवदत्त माटे | बहुजन समाज पार्टी |
| 11 | रुख्मिनी नगर - फ्रेजरपुरा | इस्माईल कासम लालुवाले | बहुजन समाज पार्टी |
| 11 | रुख्मिनी नगर - फ्रेजरपुरा | भुजाडे (बंधु) नुतन धनंजय | भारतीय जनता पार्टी |
| 11 | रुख्मिनी नगर - फ्रेजरपुरा | सचिन किसनराव वैद्य | बहुजन समाज पार्टी |
| 12 | स्वामी विवेकानंद कॉलनी - बेलपुरा | कुरिल राधा राजु | भारतीय जनता पार्टी |
| 12 | स्वामी विवेकानंद कॉलनी - बेलपुरा | प्रिती हर्षल रेवणे | युवा स्वाभीमान पार्टी |
| 12 | स्वामी विवेकानंद कॉलनी - बेलपुरा | स्मिता दिनेश सूर्यवंशी | भारतीय जनता पार्टी |
| 12 | स्वामी विवेकानंद कॉलनी - बेलपुरा | बंडु उर्फ प्रदीप हिवसे | भारतीय जनता पार्टी |
| 14 | जवाहरगेट - बुधवारा | विलास महादेवराव इंगोले | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस |
| 14 | जवाहरगेट - बुधवारा | सुनिता मनोज भेले | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस |
| 14 | जवाहरगेट - बुधवारा | ललिता सुरेश रतावा | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस |
| 14 | जवाहरगेट - बुधवारा | डॉ. संजय शिरभाते | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस |
| 15 | छाया नगर - पठाणपुरा | शाह अफसर जहा सादिक | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस |
| 15 | छाया नगर - पठाणपुरा | सैय्यद राशद अली सै. शौकत अली | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस |
| 15 | छाया नगर - पठाणपुरा | खॉ आसिया अंजुम वहिद | एमआयएम |
| 15 | छाया नगर - पठाणपुरा | शेख जफर शेख जब्बार | नॅशनलिस्ट काँग्रेस पार्टी |
| 16 | अलीम नगर - रहेमत नगर | शाह बीबी बतुल ताहेर | एमआयएम |
| 16 | अलीम नगर - रहेमत नगर | मरियम बानो मोहम्मद ईस्माईल रारानी | एमआयएम |
| 16 | अलीम नगर - रहेमत नगर | मोहंमद रेहान मोहमद यासीन | वंचित बहुजन आघाडी |
| 16 | अलीम नगर - रहेमत नगर | शेख हमिद शेख वाहेद | एमआयएम |
| 18 | राजापेठ - श्री. संत कंवरराम | सावदे नंदा धनंजय | युवा स्वाभीमान पार्टी |
| 18 | राजापेठ - श्री. संत कंवरराम | प्रा. प्रशांत आनंदराव वानखडे | युवा स्वाभीमान पार्टी |
| 18 | राजापेठ - श्री. संत कंवरराम | सौ. पद्मजा विजय कौडण्य | भारतीय जनता पार्टी |
| 18 | राजापेठ - श्री. संत कंवरराम | महेश धनराज मुलचंदानी | युवा स्वाभीमान पार्टी |
| 19 | साईनगर - अकोली | चेतन विजयराव गावंडे | भारतीय जनता पार्टी |
| 19 | साईनगर - अकोली | मंजुषा प्रशांत जाधव | शिवसेना |
| 19 | साईनगर - अकोली | देशमुख लता साहेबराव | भारतीय जनता पार्टी |
| 19 | साईनगर - अकोली | सचिन ओंकारराव भेंडे | युवा स्वाभीमान पार्टी |
| 20 | सुतगिरणी- सामरा नगर | गव्हाळे संजय रामकृष्ण | शिवसेना (उबाठा) |
| 20 | सुतगिरणी- सामरा नगर | ढोके सुमिती विजय | युवा स्वाभीमान पार्टी |
| 20 | सुतगिरणी- सामरा नगर | शारदा मंगेश खोंडे | भारतीय जनता पार्टी |
| 20 | सुतगिरणी- सामरा नगर | डॉ. राजेंद्र बापुराव तायडे | शिवसेना |
| 21 | जुनी वस्ती बडनेरा | मिरा भगवान कांबळे | एमआयएम |
| 21 | जुनी वस्ती बडनेरा | नुजहत परवीन शाकीर | एमआयएम |
| 21 | जुनी वस्ती बडनेरा | नजीबखान करीम खान | एमआयएम |
| 21 | जुनी वस्ती बडनेरा | आमेले नाना उर्फ ज्ञानेश्वर श्रीराम | युवा स्वाभीमान पार्टी |

# महापालिकेतील सत्ता संघर्ष निर्णायक टप्प्यावर

## ■ भाजप सर्वात मोठा पक्ष असला तरी बहुमत नाही
## ■ सत्ता स्थापनेसाठी कॉंग्रेसच्याही जोरदार हालचाली




**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, (दि.17)**– अमरावती महानगरपालिकेतील 87 जागांचा निकाल जाहीर झाला असला, तरीही कोणालाही स्पष्ट बहुमत मिळालेला नाही. 45 जागांचा बहुमत कुणालाही गाठता आला नसल्यामुळे महापालिकेतील सत्ता स्थापनेचे गणित सध्या अत्यंत गुंतागुंतीचे बनले आहे.

निवडणूक निकालानुसार, भाजपाला 25, कॉंग्रेस व युवा स्वाभिमान पक्षाला प्रत्येकी 15, एमआयएमला 12, राष्ट्रवादी कॉंग्रेस (अजित पवार गट) 11, शिंदेसेना 3, उध्दवसेना 2 आणि वंचितला 1 जागा मिळाल्या आहेत. सर्वच नगरसेवक कुठल्या ना कुठल्या पक्षाचे असल्याने फोडाफोडीचा किंवा अपक्षांची मनधरणीचा पर्याय यंदा उपलब्ध नाही. त्यामुळे सत्ता स्थापनेसाठी राजकीय गणितांचा खेळ सुरू आहे.

भाजप सर्वात मोठा पक्ष असूनही 25 जागांवर बहुमत जमवणे शक्य नाही. युवा स्वाभिमान पक्षासोबत युती केल्यास आघाडी 40 जागांवर पोहोचते; तरीही 5 जागांची कमतरता भासते. बसप, शिंदे गट किंवा अन्य एखाद्या पक्षाशी हातमिळवणी करावी लागणार आहे. दुसरीकडे कॉंग्रेसकडे 15 जागा असून, सत्ता स्थापनेसाठी राष्ट्रवादी, एमआयएम, शिंदेसेना, उध्दवसेना आणि वंचित यांना एकत्र आणणे मोठे आव्हान आहे.

### वरिष्ठ नेत्यांच्या भेटी सुरू

मतमोजणीनंतर नवनिर्वाचित नगरसेवकांनी वरिष्ठ नेत्यांच्या भेटी सुरू केल्या आहेत. काही नगरसेवक मुंबई, काही नागपूरपर्यंत फोनद्वारे चर्चेत गुंतले आहेत. भाजपने महापौर भाजपाचाच अशी ठाम भूमिका घेतली आहे, तर कॉंग्रेसही महापालिकेवर कॉंग्रेसचा झेंडा फडकवणार असे जाहीर करून सत्ता स्थापनेसाठी जोरदार प्रयत्न करत आहे.

### कोण स्थापणार सत्ता

2017 मध्ये भाजपाने 45 जागांवर सत्ता मिळवली होती, तर 2012 व 2007 मध्ये कॉंग्रेसच्या नेतृत्वाखाली महापालिकेत सत्ता होती. त्यामुळे इतिहास पाहता यंदा कोण सत्ता स्थापनेस यशस्वी ठरेल, हे येत्या काही दिवसांतच स्पष्ट होईल, आणि अमरावती महापालिकेतील सत्ता समीकरणात सस्पेन्स कायम राहणार आहे.

# वीजचोरीवरील कारवाईत 'दुहेरी निकष'?

## महावितरणच्या दंडसवलतींचा गूढ व्यवहार उघडकीस

**महासागर प्रतिनिधी**
**चांदुर बाजार,(दि.17)**– चांदूर बाजार येथील महावितरण कार्यालयाच्या अखत्यारीत मोठ्या प्रमाणावर वीजचोरी प्रकरणे उघडकीस आली होती. मात्र, त्या प्रकरणांत करण्यात आलेल्या कारवाईत दंडाची रक्कम अत्यंत कमी ठेवण्यात आल्याने त्वरितच संशयाची सुई फिरली होती. या कथित सवलतींबाबत *दैनिक महासागर*ने सातत्याने वृत्तांकन करून प्रश्न उपस्थित केले. त्यानंतर, तालुक्यात नुकत्याच झालेल्या वीजचोरी प्रकरणांत दंडाची रक्कम लक्षणीयरीत्या वाढवण्यात आल्याचे चित्र समोर आले आहे.

नवीन कारवाईत महावितरण कंपनीला आर्थिक फायदा झाला असला, तरी या पार्श्वभूमीवर एक गंभीर प्रश्न ऐरणीवर आला आहेण. मागील प्रकरणांत दंड कमी ठेवण्यामागे नेमके कोणाचे दबाव होते? कोणाच्या सांगण्यावरून नियमांना बगल देण्यात आली? अद्यापही संबंधित अभियंत्याची पूर्ण चौकशी झालेली नाही, असे स्पष्ट झाले आहे. विशेष म्हणजे, संबंधित अभियंत्याच्या मोबाईल कॉल डिटेल रेकॉर्ड्स (सीडीआर) तपासल्यास मोठा आणि धक्कादायक प्रकार उघड होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. दंड ठरवताना झालेल्या 'सवलती' केवळ प्रशासकीय हलगर्जीपणा होत्या की हेतुपुरस्सर केलेला गैरप्रकाराचे उत्तर अद्याप अनुत्तरित आहे.

या पार्श्वभूमीवर मोर्शी येथील कार्यकारी अभियंत्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे. ते या प्रकरणात चौकशीचे आदेश देऊन दोषींवर कारवाई करतील की प्रकरण नेहमीप्रमाणे फाइलांमध्येच गाडले जाईल, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. वीजचोरीसारख्या गंभीर गुन्ह्यात 'निवडक कारवाई' होत असेल, तर ती केवळ महावितरणची नव्हे, तर संपूर्ण व्यवस्थेची विश्वासार्हता डागाळणारी बाब ठरेल.

# शिविगाळीच्या वादातून तरुणावर चाकूने हल्ला

## चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,(दि.17)**– गाडगेनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील नवसारी रोडवरील अमन पॅलेस येथे कॅटरिंगचे काम करणाऱ्या अल्पवयीन तरुणावर शिविगाळीच्या वादातून चाकूने हल्ला केल्याची गंभीर घटना 16 जानेवारी रोजी उघडकीस आली आहे. या प्रकरणी जखमी करण प्रल्हाद राऊत (वय 17, रा. रहाटगाव) याच्या तक्रारीवरून पोलिसांनी चार तरुणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, 15 जानेवारी रोजी करण राऊत हा अमन पॅलेस येथे कॅटरिंगचे काम करण्यासाठी गेला होता. यावेळी आरोपी नयन गायकवाड याने करणला आवाज देत, तू फोनवर शिविगाळ का केलीस? असा जाब विचारला. त्यावर तू आधी शिविगाळ केलीस, म्हणून मी केली, असे करणने सांगितले. यावरून दोघांमध्ये वाद झाला. वादाचे रूपांतर हाणामारीत झाले. आरोपी नयन गायकवाड याने करणला मारहाण करण्यास सुरुवात केली. त्यानंतर यश गायकवाड व ऋषिकेश या दोघांनीही करणवर हल्ला चढवला. याचवेळी आणखी एका आरोपीने चाकूने थेट करणच्या मानेवर वार केला. या हल्ल्यात करण गंभीर जखमी झाला.

# हळदी-कुंकवाला जाणाऱ्या महिला टार्गेटवर

## अवघ्या अर्ध्या तासात दोन चेनस्नॅचिंग



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, (दि.17)**– शहरात सध्या हळदी-कुंकवाचे कार्यक्रम मोठ्या उत्साहात सुरू असताना, याच गर्दीचा गैरफायदा घेत दुचाकीस्वार चोरट्यांनी महिलांना लक्ष्य करत चेनस्नॅचिंगच्या घटना घडवल्या आहेत. बडनेरा व राजापेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवघ्या अर्ध्या तासाच्या अंतरात दोन महिलांच्या गळ्यातील सोन्याचे दागिने हिसकावून नेण्यात आले. या घटनांमुळे महिलांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

बडनेरा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील विजयपथनगर परिसरात 15 जानेवारी रोजी सायंकाळी साडेसातच्या सुमारास 57 वर्षीय महिला घराजवळून जात असताना दुचाकीवर आलेल्या दोन अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या गळ्यातील सुमारे 4 ग्रॅम वजनाची, अंदाजे 20 हजार रुपये किमतीची सोन्याची चैन हिसकावण्याचा प्रयत्न केला. महिलांनी प्रतिकार केल्याने पेंडंट खाली पडले; मात्र चोरट्यांनी उर्वरित चैन घेऊन घटनास्थळावरून पलायन केले. या प्रकरणी बडनेरा पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

### दत्तविहार कॉलनी परिसरात दुसरी घटना

दुसरी घटना राजापेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीतील दत्तविहार कॉलनी परिसरात त्याच दिवशी सायंकाळी साडेसातच्या सुमारास घडली. 38 वर्षीय महिला आपल्या मैत्रिणीसोबत हळदी-कुंकवाच्या कार्यक्रमाला जात असताना काळ्या रंगाच्या दुचाकीवर आलेल्या दोन चोरट्यांनी त्यांच्या गळ्यातील 22 ग्रॅम वजनाचे सोन्याचे मंगळसूत्र व 6 ग्रॅम वजनाची सोन्याची चैन असा सुमारे 1 लाख 40 हजार रुपयांचा ऐवज लुटला. महिलेनं आरडाओरड करून चोरट्यांना पकडण्याचा प्रयत्न केला, मात्र ते पसार झाले.

दोन्ही घटनांमध्ये चोरट्यांची कार्यपद्धती समान असल्याचे दिसून येत आहे. दुचाकीवर दोघे, एकाकी किंवा मैत्रिणीसोबत चालणाऱ्या महिलांना लक्ष्य करून झटपट दागिने हिसकावून पलायन, अशी त्यांची पद्धत आहे. बडनेरा पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक सुमेध सोनोने व राजापेठ पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक नितीन शिंदे या प्रकरणांचा तपास करीत आहेत.

# वनी फाट्यावर बुलेरो-दुचाकीची भीषण धडक

## दोन युवक गंभीर जखमी



**महासागर प्रतिनिधी**
**तिवसा,(दि.17)** – तिवसा शहरालगत राष्ट्रीय महामार्गावरील वनी फाटा परिसरात शुक्रवारी (दि. 17) दुपारी साडेएकच्या सुमारास बुलेरो कार व दुचाकी यांच्यात झालेल्या भीषण अपघातात दुचाकीवरील दोन युवक गंभीर जखमी झाले. अपघातानंतर काही काळ महामार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली होती.

वनी फाटा परिसरात राहुल इंडियन गॅस सिलेंडरचे गोडाऊन असल्याने येथे दिवसभर नागरिकांची व वाहनांची मोठ्या प्रमाणावर वर्दळ असते. जखमी युवक गॅस सिलेंडर घेण्यासाठी जात असताना नागपूरकडून येणाऱ्या बुलेरो कारने दुचाकीला जोरदार धडक दिल्याची माहिती आहे. प्राप्त माहितीनुसार, बुलेरो कार (क्र. एमएच 27 डीई 4282) ही इंडियन गोडाऊनकडून राष्ट्रीय महामार्गाकडे वळत असताना दुचाकी (क्र. एमएच 27 बीआर 0226)ला धडकली. धडकेची तीव्रता इतकी होती की दुचाकीस्वार रस्त्याच्या कडेला दूर फेकले गेले. या अपघातात श्रीकांत सुधीर देशमुख (35, रा. वणी) व मंथन बबन देशमुख (18, रा. वणी) हे दोघे गंभीर जखमी झाले. एकाच्या पायाला तर दुसऱ्याच्या छातीला गंभीर दुखापत झाली आहे. घटनास्थळी उपस्थित नागरिकांनी तत्काळ मदत करत जखमींना तिवसा उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. मात्र प्रकृती गंभीर असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी अमरावती येथील रुग्णालयात हलविण्यात आले. घटनेची माहिती मिळताच तिवसा पोलीस घटनास्थळी दाखल झाले. पंचनामा करून वाहतूक सुरळीत करण्यात आली असून अपघाताचा पुढील तपास तिवसा पोलीस करीत आहेत.



# डेन्टल क्लिनिक मध्ये चोरी

**अमरावती**– राजापेठ पोलिस ठाण्याच्या हद्दीतील प्रतीक टॉवर राहणार्या एका डेन्टल डॉक्टरच्या घरातून अज्ञात चोरट्याने सुमारे 4 लाख 40 हजार रुपयांचा सोन्या-चांदीचा व रोख ऐवज लंपास केला. ही घटना 16 जानेवारी रोजी उघडकीस आली आहे. या प्रकरणी राजापेठ पोलीस ठाण्यात घरफोडीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी शशांक दुबे (वय 30 वर्षे) हे आपल्या कुटुंबासह सदर इमारतीत वास्तव्यास असून, त्यांच्या घराच्या वरच्या मजल्यावर डेन्टल क्लिनिक आहे. 15 जानेवारी 2026 रोजी रात्री, घरातील आई, वडील, लहान भाऊ व आजी आपापल्या खोल्यांमध्ये झोपले असताना ही घटना घडली. 16 जानेवारी रोजी पहाटे, फिर्यादी शशांक हे क्लिनिकची साफसफाई करण्यासाठी उठले असता, मोबाईलच्या टॉर्चच्या उजेडात ग्राउंड फ्लोअरवर एक अनोळखी इसम संशयास्पदरीत्या सामान पाहताना दिसून आला.

# संत बेंडोजी महाराज समाधी सोहळा 19 जानेवारीपासून

## 689 व्या वर्षात भव्य आयोजन



**महासागर प्रतिनिधी**
**चांदूर रेल्वे, (दि. 17)** – चांदूर रेल्वे तालुक्यातील घुईखेड येथील प्रसिध्द श्री संत बेंडोजी महाराज यांच्या संजीवन समाधी सोहळ्याला यावर्षी सोमवार, 19 जानेवारीपासून प्रारंभ होत असून 30 जानेवारीपर्यंत हा महोत्सव मोठ्या उत्साहात साजरा होणार आहे. या संदर्भातील सविस्तर माहिती संस्थानचे विश्वस्त प्रविण घुईखेडकर यांनी चांदूर रेल्वे येथे आयोजित पत्रकार परिषदेत दिली. यावेळी नंदकिशोर काकडे, गजानन फिस्के व कैलास सावनकर उपस्थित होते.

संपूर्ण महाराष्ट्रासह इतर राज्यांतील भाविकांचे श्रद्धास्थान असलेले आणि विदर्भातील एकमेव संजीवन समाधी म्हणून ओळखले जाणारे श्री संत बेंडोजी महाराज यांनी इ.स. 1337 मध्ये संजीवन समाधी घेतली होती. त्यानंतर दरवर्षी हा सोहळा अखंडपणे सुरू असून यंदा त्याचे 689 वे वर्ष आहे. कालांतराने या महोत्सवाला भव्य स्वरूप प्राप्त झाले असून हजारो भाविक मोठ्या भक्तिभावाने सहभागी होतात.




सोमवार, 19 जानेवारी रोजी श्री संत बेंडोजी महाराज मंदिरात तीर्थ स्थापना, कलश स्थापना, अभिषेक व लघुरुद्राभिषेक संस्थानचे अध्यक्ष वसंतराव घुईखेडकर, दिनकर घुईखेडकर व शशिकांत चौधरी सह पत्नी यांच्या हस्ते होणार आहे. त्यानंतर शुभांगी व संजय कुचेवार (मुंबई) यांच्या हस्ते संगीतमय शिवपुराण कलश स्थापना व पूजन करण्यात येणार आहे. संगीतमय शिवपुराण कथा प्रवक्त्या विदर्भ कन्या ह.भ.प. वैभवश्रीजी पांडे (वृंदावन) या सांगणार असून सप्ताहादरम्यान दररोज सकाळी 9 ते 12 व दुपारी 3 ते 6 या वेळेत कथा होणार आहे.

दररोज सकाळी 5 ते 6 सामुदायिक प्रार्थना, काकडा आरती, ग्रामसफाई व गावातून फेरी काढली जाणार आहे. सकाळी 8 वाजता आरती, श्री बेंडोजी बाबा ग्रंथाचे पारायण वाचन ह.भ.प. निवृत्तीनाथ गोळे (बग्गी) करणार आहेत. आठ दिवस विविध किर्तनकारांची किर्तने तसेच भजन कार्यक्रम विविध मंडळांमार्फत होणार आहेत. दररोज अन्नदानाचे आयोजनही करण्यात आले आहे.




26 जानेवारी रोजी दुपारी 11 ते 2 या वेळेत ह.भ.प. उमेश महाराज जाधव (आळंदीकर) यांचे काल्याचे किर्तन व कालावाटप होईल. सायंकाळी 4 वाजता गोपालकाला, दहिहांडी, तर सायंकाळी 7 वाजता महाप्रसाद होणार आहे. दहिहांडीच्या कार्यक्रमानंतर यात्रा महोत्सवाला सुरुवात होईल. 30 जानेवारी रोजी गोत आंबील महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. महोत्सवादरम्यान जंगी शंकरपटाचेही आयोजन करण्याचे नियोजन सुरू असल्याचे सांगण्यात आले. या सर्व कार्यक्रमांचा लाभ घ्यावा, असे आवाहन संस्थानचे अध्यक्ष वसंतराव घुईखेडकर, विश्वस्त प्रविण घुईखेडकर, राजाभाऊ चौधरी व इतर पदाधिकाऱ्यांनी भाविकांना केले आहे.

# आमच्या पराभवामागे नवनीत राणा!

## ■ तात्काळ भाजपातून निष्कासनाची मागणी
## ■ आक्रोशित भाजपा उमेदवारांचा आरोप



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, (दि. 17)** – अमरावती महानगरपालिकेच्या निवडणुकीत झालेल्या पराभवाला विरोधी पक्ष जबाबदार नसून, भाजपाच्या नेत्या नवनीत कौर राणा यांच्या पक्षविरोधी भूमिकेमुळेच आम्हाला हार पत्करावी लागली, असा गंभीर आरोप आक्रोशित भाजपा उमेदवारांनी केला आहे. त्यांनी नवनीत राणा यांचे तात्काळ भाजपातून निष्कासन करण्यात यावे, अशी मागणी पक्षश्रेष्ठींकडे केली आहे.

उमेदवारांचे म्हणणे आहे की, नवनीत राणा यांनी भाजपात राहूनच भाजपाच्या उमेदवारांविरोधात नियोजनबद्ध कट रचला. भाजपाचे गड मानल्या जाणाऱ्या प्रभागांमध्ये स्वत:च्या समर्थक उमेदवारांना उभे करून अधिकृत उमेदवारांचे नुकसान केले. शहरभर भाजपाच्या पोस्टर्सवर स्वत:चा मोठा फोटो लावून संभ्रम निर्माण केला गेला. त्यानंतर संघटना निष्क्रिय करण्यात आली व अधिकृत उमेदवारांची उमेदवारी मागे घेतल्याचे पत्र शहरभर फिरवून प्रचारात गैरवापर करण्यात आला, असा आरोप आहे.

शेवटच्या टप्प्यात नवनीत राणा यांनी खुलेआम भाजपाच्या विरोधात प्रचार करत भाजपाचे उमेदवार डमी असून युवा स्वाभिमान पक्षाचे उमेदवारच खरे भाजपाचे उमेदवार आहेत, असा प्रचार केला. पैशाची मोठ्या प्रमाणावर उधळण व मतदारांवर दबाव टाकण्यात आल्याचाही आरोप उमेदवारांनी केला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे आशीर्वाद असल्याचा दावा करून मतदारांमध्ये संभ्रम निर्माण करण्यात आला, असेही त्यांनी सांगितले.

### भाजपाचा सुपडा साफ होऊ नये

आम्ही लोकसभा व विधानसभा निवडणुकांमध्ये राणा दाम्पत्यासाठी प्रामाणिकपणे काम केले. मात्र मनपा निवडणुकीत आम्हालाच गद्दार ठरवून सामान्य कार्यकर्त्यांना उध्वस्त करण्यात आले, असे उमेदवारांनी नमूद केले. यापूर्वी राष्ट्रवादी काँग्रेसमध्येही अशीच परिस्थिती निर्माण झाल्याचा दाखला देत, भाजपाचा सुपडा साफ होऊ नये, यासाठी नवनीत राणा यांना तात्काळ पक्षाबाहेरचा रस्ता दाखववावा, अशी कळकळीची मागणी त्यांनी केली आहे. या मागणीसाठी आशिष अतकरे, अभिजित वानखडे, चेतन गावंडे, ऋषी खत्री, डॉ. वीरेंद्र ढोबळे, नरेश धामाई, सुनंदा खरड, मृणाली चौधरी, अपर्णा ठाकरे, चेतन पवार, राजेश शादी, रोशनी वाकडे, बरखा शर्मा, रिटा मोकळकर, संतोष पिढेकर, गौरव बांते, प्रणित सोनी, योगेश निमकर, राजेश पड्डु साहू, लता देशमुख, संध्या टिकले व स्वाती निस्ताने यांनी एकत्रितपणे आवाज उठविला आहे.

# स्वीकृतसाठी गटनेतेकडून महेश सोमवंशीच्या नावाची सेटींग

## भाजपमधील इच्छूकांचा आरोप



**महासागर प्रतिनिधी**

**चुरणी,( दि.17 )** – चिखलदरा नगर परिषदेच्या स्विकृत सदस्य निवडण्याच्या प्रक्रीयेत गटनेता राजेश मांगलेकर यांनी महेश सोमवंशी यांच्या नावाची सेटींग करण्यात आली असल्याचा आरोप भाजपच्या इच्छूक उमेदवाराकडून करण्यात आली. आमदार आणि स्थानिक भाजप नेतृत्व अडचणीत आले आहे. या प्रकरणी भाजप शहराध्यक्ष वेदांत सुरपाटणे यांनी गटनेते राजेश मांगलेकर यांच्यावर पक्षाच्या आदेशाचे उल्लंघन केल्याचा गंभीर आरोप केला आहे.

पक्षाच्या बैठकीत स्वीकृत नगरसेवकाच्या एका पदासाठी पाच इच्छूकांची नावे वरिष्ठांकडे पाठविण्याचा ठराव करण्यात आला होता. असे असतानाही गटनेते राजेश मांगलेकर यांच्यावर आरोप आहे की, त्यांनी केवळ महेश सोमवंशी यांचेच नाव पुढे केले.

8 जानेवारी रोजी त्यांनी कोणालाही न कळवता जिल्हाधिकारी कार्यालयात अर्ज भरला. महाराष्ट्र नगरपरिषद कायद्यानुसार प्रथम अर्ज करणाऱ्याचे नाव ग्राह्य धरले जात असल्याने सोमवंशी स्वीकृत नगरसेवक ठरले. या घटनेमुळे भाजपमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला असून, ज्येष्ठ कार्यकर्ते शेख अन्सार यांनी पक्षातील सर्व जबाबदाऱ्यांचा राजीनामा दिला आहे. तसेच महिला नेत्या माया खनाल यांनीही पक्षाला सोडचिठ्ठी दिल्याची माहिती आहे.

मी वरिष्ठांकडे तक्रार करणार आहे. मांगलेकर यांनी जाणीवपूर्वक माझे नाव वगळले. तरी मी भाजपमध्येच राहीन.

**वेदांत सुरपाटणे, शहराध्यक्ष, भाजप, चिखलदरा**

# शंकरपटाच्या परंपरेला पोलीसांकडून अडथळा?

## एनओसी साठी टाळाटाळ

**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर रेल्वे,( दि.17 )** – ग्रामीण संस्कृतीशी नाळ जोडलेला आणि वर्षानुवर्षे परंपरेने साजरा होणारा शंकर पट यंदा वादाच्या भोवऱ्यात अडकला आहे. चांदूर रेल्वे तालुक्यातील घुईखेड येथे लवकरच श्री बेंडोजी बाबा संजीवन समाधी सोहळ्याला सुरुवात होत असून, या सोहळ्याचे प्रमुख आकर्षण असलेल्या पारंपरिक शंकरपटाच्या आयोजनास तळेगाव दशासर पोलिस हे एनओसी देण्यास टाळाटाळ करीत असल्याचा आरोप करण्यात येत आहे.

सदर सोहळ्याच्या काळात गावात शंकरपटाचे आयोजन करणे ही जुनी आणि श्रद्धेची परंपरा आहे. मात्र, यंदा कोणतेही स्पष्ट कारण न देता पोलीस प्रशासनाने परवानगी नाकारल्याने ग्रामस्थांमध्ये नाराजीचा सूर उमटत आहे.



शंकरपट ही आमच्या गावाची श्रद्धा आणि ओळख आहे. पिढ्यान्पिढ्या हा कार्यक्रम शांततेत आणि शिस्तीत पार पडतो. तरीही यंदा तळेगाव दशासर पोलिसांनी कोणतेही ठोस कारण न देता एनओसी नाकारली आहे. ग्रामीण संस्कृती दाबण्याचा हा प्रयत्न असून प्रशासनाने तात्काळ निर्णयाचा फेरविचार करावा.

**प्रवीण घुईखेडकर**
**विश्वस्त, श्री. बेंडोजी बाबा संस्थान, घुईखेड**

परवानगी देण्याचा अधिकार आम्हाला नाही. शंकरपटाच्या आयोजनाकरिता परवानगी जिल्हाधिकारी कार्यालयातून आयोजकांनी आणावी. वरिष्ठांच्या आदेशानुसार आम्ही काम करू.

**किरण औटे, ठाणेदार, तळेगाव दशासर**

या निर्णयामुळे धार्मिक परंपरा, ग्रामीण लोककला आणि गावच्या सांस्कृतिक वारशावर गदा येत असल्याची भावना व्यक्त होत आहे. प्रशासनाने याबाबत सकारात्मक भूमिका घ्यावी, अशी मागणी ग्रामस्थ आणि संस्थानकडून होत आहे.

# 1900 शेतकऱ्यांना दिवसा विजेची सोय

## 10 मेगावॅट जवर्डी सौर प्रकल्पामुळे लाभ



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.17 )**– दिवसा विजेची सोय उपलब्ध झाल्याने शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेअंतर्गत महावितरणसाठी महानिर्मिती कंपनीच्या वतीने चांदूर बाजार तालुक्यात उभारण्यात आलेला 10 मेगावॅट क्षमतेचा जवर्डी सौर प्रकल्प कार्यान्वित करण्यात आला आहे. या प्रकल्पामुळे तालुक्यातील 1 हजार 870 हून अधिक शेतीपंपांना थेट लाभ होणार असून सुमारे 1900 शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठ्याची सुविधा मिळणार आहे.

मुख्य अभियंता श्याम राठोड (महानिर्मिती) यांच्या हस्ते व कार्यकारी अभियंता प्रदीप अंधारे व धीरज गादे यांच्या उपस्थितीत या प्रकल्पाचे उद्घाटन करण्यात आले. हा विदर्भातील महानिर्मिती कंपनीने उभारलेला दुसरा सौर प्रकल्प असल्याची माहिती श्याम राठोड यांनी दिली.

जिल्ह्यात मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना 2.0 अंतर्गत 90 उपकेंद्रांसाठी विकेंद्रीत स्वरूपात सौर प्रकल्प उभारले जात असून त्यातून 328 मेगावॅट वीज निर्मितीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. अधीक्षक अभियंता दीपक देवहाते यांच्या मार्गदर्शनाखाली या योजनेला गती मिळाली आहे. सध्या जिल्ह्यात 12 सौर प्रकल्प कार्यान्वित असून त्यातून 59 मेगावॅट वीज निर्मिती सुरू झाली आहे.

त्यामुळे 20 हजार 225 शेतकऱ्यांना थेट लाभ मिळत आहे. 40 एकर क्षेत्रावर उभारलेल्या जवर्डी सौर प्रकल्पाची वीज महावितरणच्या 33 केव्ही तोंडगाव उपकेंद्राला जोडण्यात आली आहे. या उपकेंद्रातून निघणाऱ्या चार कृषी वाहिन्यांद्वारे बेलज, बोरगाव मोहना, रामापूर, नारायणपूर, कविठा, कांडली, विठ्ठलपूर, तळेगाव, पिंपरी, मोचखेडा, आमलापूर, तोंडगाव व घोडगाव येथील शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा मिळणार आहे.

# रोख जप्तीप्रकरणाचा अहवाल निवडणूक विभागाकडे

## महादेवखोरीतील कारमधून झाली होती 2. 96 हजार रुपयांची रोख जप्त

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.17 )**– शहरातील महादेवखोरी परिसरात उभ्या असलेल्या कारमधून 2 लाख 96 हजार रुपयांची रोकड जप्त केल्याप्रकरणी पोलिसांनी सखोल चौकशी करून आपला अहवाल निवडणूक विभागाकडे सादर केला आहे. निवडणूक विभागाकडून करण्यात येणाऱ्या तपासानंतर प्राप्त माहितीनुसार पुढील कारवाई केली जाईल, अशी माहिती पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी दिली. 14 जानेवारी रोजी सायंकाळी सुमारे 6 वाजताच्या सुमारास फ्रेजरपुरा पोलीस ठाण्याचे पथक महादेवखोरी परिसरात गस्त घालत असताना कार क्रमांक एमएच 27/डीयू 5667 मध्ये रोकड असल्याची माहिती मिळाली. याच दरम्यान सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी बोबडे यांनाही नागरिकांकडून कारमध्ये रोकड असल्याची माहिती प्राप्त झाली होती. त्यानंतर सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी व संबंधित पथक घटनास्थळी दाखल होवून पुढिल कारवाई केली.

# बारगावच्या सुपुत्राचा देशसेवेत गौरवशाली प्रवेश!

**महासागर प्रतिनिधी**

**वरुड,( दि.17 )** – जिल्हा परिषद शाळेतील आदर्श शिक्षक ओमप्रकाश युवनाते यांचे सुपुत्र चि. शुभम ओमप्रकाश युवनाते यांची बॉर्डर सिक्युरिटी फोर्स मध्ये निवड झाल्याने बारगाव गावात अभिमान व आनंदाचे वातावरण पसरले आहे. देशाच्या सीमेचे रक्षण करण्याची जबाबदारी मिळाल्याने शुभमने आपल्या कुटुंबासह संपूर्ण गावाचे नाव उज्ज्वल केले आहे. या यशानिमित्त शुभमच्या निवासस्थानी सदिच्छा भेटींचा ओघ सुरू असून प्रणित कुबडे व मित्रपरिवाराच्या वतीने शाल व श्रीफळ देऊन त्याचा सन्मान करण्यात आला. उपस्थितांनी शुभमच्या मेहनत, चिकाटी व शिस्तप्रिय स्वभावाचे मन:पूर्वक कौतुक केले. शिक्षक वडील ओमप्रकाश युवनाते यांच्या मार्गदर्शनाखाली व कुटुंबाच्या पाठबळावर शुभमने सातत्यपूर्ण परिश्रमातून हे यश संपादन केले. ग्रामीण



भागातून येऊन राष्ट्रीय स्तरावरील सुरक्षा दलात स्थान मिळवणे ही बाब तरुणांसाठी प्रेरणादायी आहे. या सत्कारप्रसंगी नातेवाईक, मित्रपरिवार व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. शुभमच्या निवडीमुळे बारगावचा गौरव वाढला असून, देशसेवेसाठी सदैव सज्ज असलेल्या या तरुणाच्या उज्ज्वल भविष्यासाठी सर्वांनी शुभेच्छा व्यक्त केल्या.

# बेंबळा प्रकल्पातून धामकच्या पुनर्वसनाला 89.32 कोटी

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.17 )**– यवतमाळ जिल्ह्यातील बेंबळा नदी प्रकल्पासाठी 4 हजार 775 कोटी रुपयांच्या तरतुदीस मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली असून या निर्णयाचा थेट लाभ अमरावती जिल्ह्यालाही होणार आहे. या प्रकल्पामुळे अमरावतीतील मौजा धामक गावाच्या पुनर्वसनासाठी 89 कोटी 32 लाख रुपये उपलब्ध होणार असून दीर्घकाळ प्रलंबित असलेला पुनर्वसनाचा प्रश्न मार्गी लागणार आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत या निर्णयाला मंजुरी देण्यात आली. धामक गावाचे आदर्श पद्धतीने पुनर्वसन करण्याचे निर्देश यापूर्वीच मुख्यमंत्री यांनी दिले होते. त्यानुसार बाधित कुटुंबांना सुरक्षित घरे, पाणीपुरवठा, वीज, रस्ते, शाळा, आरोग्य सुविधा आदी मूलभूत सोयी उपलब्ध करून देण्यावर भर दिला जाणार आहे. बेंबळा नदीवरील हा प्रकल्प यवतमाळ जिल्ह्यातील बाभुळगाव तालुक्यातील खडकसावंगा गावाजवळ असून तो विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळांतर्गत येतो. हा प्रकल्प प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेंतर्गत समाविष्ट असून केंद्र सरकारकडून त्याचा नियमित आढावा घेतला जात आहे. या प्रकल्पामुळे यवतमाळ जिल्ह्यातील नेर, बाभुळगाव, कळंब, राळेगाव व मारेगाव या पाच तालुक्यांतील एकूण 58 हजार 768 हेक्टर क्षेत्राला सिंचनाचा लाभ मिळणार आहे. तसेच पिण्याच्या पाण्यासाठी व मत्स्य व्यवसायासाठीही पाणी उपलब्ध होणार आहे. बेंबळा प्रकल्पामुळे विदर्भातील शेती, रोजगारनिर्मिती आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना मिळणार असून अमरावती जिल्ह्यासाठी धामक पुनर्वसनाचा ऐतिहासिक मार्ग मोकळा होणार आहे.

# टेंभूरखेडा-भेमडी पूल तातडीने सुरू करण्यासाठी पीडब्ल्यूडीकडे मागणी



**महासागर प्रतिनिधी**

**वरूड,( दि.17 )** – टेंभूरखेडा ते भेमडी गावाला जोडणारा मुख्य पूल गेल्या एक वर्षापासून मंजूर असूनही अद्याप प्रत्यक्ष बांधकामास सुरुवात झालेली नाही. या पुलाअभावी टेंभूरखेडा व भेमडी येथील शेतकरी, विद्यार्थी तसेच नागरिकांना दररोज मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

ही गंभीर बाब लक्षात घेऊन शिवसेना युवा सेना तालुका प्रमुख अनिल लोखंडे, शिवसेना जिल्हा परिषद बेनोडा सर्कल प्रमुख व संघटनेचे प्रमुख पवन ठाकरे, शिवसेना वरूड तालुका अध्यक्ष गौरवभाऊ सरोदे, उपजिल्हा प्रमुख अमोल भुयार, शिवसेना जरुड शाखा प्रमुख राहुल देशमुख, जिल्हा परिषद शिवसेना जरुड सर्कल प्रमुख युगल गायकवाड, शेतकरी प्रशांत पंडागळे, विनोद देशमुख आदींसह त्यांच्या संपूर्ण टीमने सार्वजनिक बांधकाम विभाग (पीडब्ल्यूडी) कार्यालयात प्रत्यक्ष भेट देत अधिकृत निवेदन सादर केले.

या भेटीदरम्यान पीडब्ल्यूडीचे अधिकारी व कर्मचारी यांच्यासमोर टेंभूरखेडा-भेमडी पुलाचे काम रखडल्यामुळे निर्माण झालेल्या समस्या सविस्तरपणे मांडण्यात आल्या. विशेषत: भेमडी गावातील विद्यार्थ्यांच्या दैनंदिन प्रवासातील सुरक्षिततेचा प्रश्न, तसेच टेंभूरखेडा व भेमडी येथील शेतकऱ्यांना शेतात ये-जा करताना भेडसावणाऱ्या अडचणी याकडे शिवसेनेने ठोसपणे लक्ष वेधले.

शिवसेनेने पुलाचे बांधकाम तातडीने सुरू करावे, अशी स्पष्ट व ठाम मागणी करत अधिकृत अर्ज सादर केला. हा पूल केवळ दोन गावांना जोडणारा नसून, शेतकऱ्यांचे शेतीकाम, विद्यार्थ्यांचे शिक्षण तसेच नागरिकांची सुरक्षित व सुलभ वाहतूक यासाठी अत्यंत महत्त्वाचा असल्याचे संघटनेने अधोरेखित केले.ग्रामीण जनतेच्या प्रश्नांसाठी पुढाकार घेऊन प्रशासनाशी थेट संवाद साधण्याचा हा प्रयत्न कौतुकास्पद असून, येत्या काळात पुलाच्या कामाला गती मिळेल, अशी अपेक्षा ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे. भविष्यातही शिवसेना अशाच प्रकारे जनहिताच्या प्रश्नांसाठी लढा देत राहील, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

## दारूच्या नशेत आई-मुलाला मारहाण

**अमरावती** – फ्रेजरपुरा पोलिस स्टेशनच्या हद्दीतील महादेव खोरी परिसरातील गौतम नगर येथे घरगुती हिंसाचाराची धक्कादायक घटना घडली. येथील एका तक्रारदार महिला घरी असताना आरोपी नीलेश फुटाणे दारू पिऊन घरी परतला. कपड्यांसाठी पैसे मागितल्यावर महिलेने नकार दिला. याचा राग आल्याने आरोपीने रॅप्टरने महिलेसह तिच्या अल्पवयीन मुलाला मारहाण केली. या प्रकरणी सोमवारी महिलेच्या तक्रारीवरून फ्रेझरपुरा पोलिसांनी आरोपी नीलेश फुटाणेविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

# दुषित पाणीपुरवठ्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात

## ग्रामपंचायतीचा भोंगळ कारभार, अनेक ठिकाणी पाइपलाइन लिकेजकडे दुर्लक्ष

**महासागर प्रतिनिधी**

**अंजनगाव बारी,( दि.17 )**– अंजनगाव बारी परिसरात गेल्या चार महिन्यांपासून घरगुती नळांना गढूळ व दुषित पाण्याचा पुरवठा होत असल्याने नागरिकांच्या आरोग्याला गंभीर धोका निर्माण झाला आहे. याबाबत ग्रामस्थांनी वारंवार तोंडी तसेच लेखी तक्रारी करूनही ग्रामपंचायतीकडून कोणतीही ठोस कार्यवाही करण्यात आलेली नाही, अशी तीव्र नाराजी नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे.

गावातील अनेक भागांमध्ये नळांना पाणीच येत नसल्याने पिण्याच्या पाण्यासाठी नागरिकांची मोठी गैरसोय होत आहे. विशेषत: वार्ड क्रमांक 3 मध्ये घरगुती नळांच्या पाइपलाइनला लिकेज असल्याच्या तक्रारी मोठ्या प्रमाणात असून, सांडपाणी व माती मिश्रित पाणी नळांद्वारे येत असल्याचे चित्र आहे. यामुळे पोटदुखी, जुलाब, ताप, त्वचारोग यांसारख्या आजारांचा धोका वाढला आहे. स्वच्छता व पाणीपुरवठा समितीची बैठक गेल्या पाच वर्षांत एकदाही न झाल्याचे समोर आले आहे. प्रत्यक्षात पाणीपुरवठ्याचे नियोजन व देखरेख या समितीमार्फत होणे अपेक्षित असते. मात्र ग्रामपंचायतीच्या पदाधिकाऱ्यांच्या



दुर्लक्षामुळे नियमित पाणीपुरवठा होत नसल्याची नागरिकांची तक्रार आहे. पाणीकर वसुली सुमारे 50 टक्क्यांनी घटली असून, त्यासाठी सदस्यांचे सहकार्य न मिळाल्याने वसुली प्रक्रियेतही अडथळे येत आहेत. जलस्वराज्य-2 योजना सुरू झाल्यानंतर काही काळ पाणीपुरवठा सुरळीत होता. मात्र गेल्या पाच वर्षांत पाण्याच्या वेळा व दिवसांमध्ये अनियमितता वाढत गेली असून, आता या योजनेचे भवितव्य काय, असा सवाल ग्रामस्थ उपस्थित करीत आहेत.

### ग्रामप्रशासनाचे नियंत्रण नाही ?

गटविकास अधिकारी व ग्रामविकास अधिकारी हे ग्रामप्रशासनाचे मुख्य सूत्रधार असून, त्यांच्या नियंत्रणाअभावी ही परिस्थिती निर्माण झाल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. दुषित पाण्यामुळे आरोग्याला हानी झाल्यास त्याची जबाबदारी ग्रामपंचायत प्रशासनावर राहील, अशी ठाम भूमिका ग्रामस्थांनी घेतली आहे. यासंदर्भात संताजी जगनाडे तैलिक समितीचे अध्यक्ष गणेश नवखरे, उपाध्यक्ष सौरभ भांडे व सचिव रोशन जुमळे यांनी ग्रामप्रशासनाकडे अधिकृत तक्रार दाखल केली असून, तात्काळ उपाययोजनांची मागणी केली आहे.

# परतवाडा शहरालगत देवमाळी ग्रामपंचायतीतील प्रशासकाची मनमानी

## सांडपाण्यामुळे नागरिक त्रस्त, आंदोलनाचा इशारा

**महासागर प्रतिनिधी**

**परतवाडा( दि.17 )** – परतवाडा शहराला लागून असलेल्या देवमाळी ग्रामपंचायत अंतर्गत श्रीनगर (हनुमान नगर) परिसरात सांडपाण्याची गंभीर समस्या अनेक दिवसांपासून कायम आहे. ग्रामपंचायतीच्या प्रशासकांच्या मनमानी व उदासीन कारभारामुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत असून, येथील सांडपाणी थेट रस्त्यावरून वाहत असल्याने परिसरातील दैनंदिन जीवन विस्कळीत झाले आहे. यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्नही गंभीर बनला आहे.

या समस्येबाबत हनुमान नगर परिसरातील नागरिकांनी देवमाळी ग्रामपंचायतीच्या प्रशासकांची प्रत्यक्ष भेट घेऊन पक्की नाली बांधण्याची मागणी केली होती. तसेच यासंदर्भात लेखी निवेदन सादर करून, प्रशासकांनी प्रत्यक्ष स्थळ पाहणी करून सांडपाण्याची योग्य विल्हेवाट लावण्यासाठी तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी विनंतीही करण्यात आली होती. मात्र, प्रशासकांनी केवळ कच्ची नाली खोदून तात्पुरती उपाययोजना केल्याने समस्या सुटण्याऐवजी अधिक गंभीर झाली आहे.सदर खोदकाम सिमेंट रस्त्यालगत करण्यात आल्यामुळे रस्ता खचण्याची दाट शक्यता निर्माण झाली असून, वाहनचालक व पादचाऱ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. नागरिकांनी यावर तीव्र आक्षेप नोंदवून सिमेंटची पक्की नाली बांधण्यात यावी, अशी ठाम मागणी केली आहे. तरीसुद्धा प्रशासक जाणीवपूर्वक टाळाटाळ करीत असल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे.विशेष म्हणजे, या कामाचे अंदाजपत्रक





आधीच तयार असून संबंधित शाखा अभियंत्यांनी काम तातडीने मार्गी लावण्याची शिफारसही केली आहे. असे असतानाही प्रशासकांकडून जाणीवपूर्वक दिरंगाई होत असल्याचे चित्र आहे. परिणामी सांडपाण्याचा प्रश्न दिवसेंदिवस अधिक गंभीर होत असून, परिसरात दुर्गंधी, डासांचा प्रादुर्भाव वाढला आहे. त्यामुळे विविध आजारांचा धोका निर्माण झाला आहे. प्रशासनाच्या या दुर्लक्षामुळे संतप्त झालेल्या नागरिकांनी आंदोलनाचा इशारा दिला आहे. तात्काळ पक्की नाली बांधून सांडपाण्याची कायमस्वरूपी व्यवस्था करण्यात यावी, अन्यथा ग्रामपंचायत कार्यालयासमोर तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा स्पष्ट इशारा



नागरिकांनी दिला आहे. प्रशासकांनी त्वरित निर्णय घेऊन काम मार्गी लावावे, अशी मागणी परिसरातून जोर धरत आहे.

## जाहिरात

जन्म प्रमाण पत्र मिळने बाबत संध्या रामसिंग चिलात्रे रा. गौलखेडा ता. धारणी यांचा जन्म दिनांक 16/09/2012 रोजी गांव गौलखेडा ता. धारणी येथे झालेला आहे. या बाबत ग्राम पंचायतमध्ये नोंद नाही परंतु यांना जन्म दाखल्याची आवश्यकता आहे. करिता कोनाला या बाबत आक्षेप असल्यास त्यांनी 30 दिवसात आक्षेप दाखल करावे. सदर प्रसिद्धि ग्रामपंचायत पानखाल्या ता. धारणी येथे नोटिस बोर्ड वर लावण्यात आली आहे.

**संध्या रामसिंग चिलात्रे**

## जाहिरात

मृत्यु प्रमाण पत्र मिळने बाबत रामलाल बुडा काकडे रा. अंबाडी ता. धारणी यांचा मृत्यु दिनांक 07/07/1985 रोजी गांव अंबाडी ता. धारणी येथे झालेला आहे. या बाबत ग्राम पंचायतमध्ये नोंद नाही परंतु यांना मृत्यु दाखल्याची आवश्यकता आहे. करिता कोनाला या बाबत आक्षेप असल्यास त्यांनी 30 दिवसात आक्षेप दाखल करावे. सदर प्रसिद्धि ग्रामपंचायत पानखाल्या ता. धारणी येथे नोटिस बोर्ड वर लावण्यात आली आहे.

**रामलाल बुडा काकडे**

RNINO-46975/1985 Dainik Mahasagar Amravati

Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak; printed at Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and published at Dainik Mahasagar Office, Hotel Tourist Beside Railway Station square, Amravati. Amravati head office, address: Dainik Mahasagar, Hotel Tourist beside Railway Station square, Amravati, phone no. 9518934504.
Group Editor-in-Chief and Managing Director- Shrikrishna Tansukhdas Chandak, Group Editor - Sandeep Ramrao Kale, Managing Editor - Pankaj Shrikrishna Chandak

आर.एन.आय. नोंदणी क्रमांक ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर, ४४००१८, येथे छापून, दैनिक महासागर कार्यालय, हॉटेल टुरिस्टच्या बाजूला, रेल्वे स्टेशन चौक, अमरावती, येथे प्रकाशित केले. मुख्य संपादक व मॅनेजिंग डायरेक्टर : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, समूह संपादक : संदीप रामराव काळे, प्रबंध संपादक : पंकज श्रीकृष्ण चांडक

